# <u>कीर्ती</u>

मर्त्य मूर्ख मी तसे माझे नाम
व्याकरणीच ते विशेष नाम
इतरही काहींचे तेच नाम
तरीही किती त्याचा अभिमान ||१||

जन्मतःच जे मजला मिळाले
तनीमनी आमरण गुंतले
वाटे मरणोपरांत टिकावे
मर्त्या कसे अमरत्व मिळावे ||२||

मरूनीही म्हणे नाम उरावे
मूर्खा कसे हे रहस्य कळावे
आजन्मी जो स्वार्थात गुरफटे
नाम नामाचे कीर्ती ज्यां न कळे ||३||

– नारायण
१०/०५/२३